# स्वागतगीत - (For BMM Convention, LA - 2015)

----- दिलीप वि. चित्रे

बीज पेरले प्रथम पिढीने वृक्ष जाहले त्यांचे
त्या वृक्षांना फळे लगडली भाग्य आमुचे तुमचे

स्वागतास सर्वांच्या जमलो मैत्र पिढ्यांचे जेथे
अमृताहुनी गोड ओंजळी फळे आमुच्या येथे
आज जाहले कणखर, कोमल पाते हे गवताचे
बीज पेरले प्रथम पिढीने वृक्ष जाहले त्यांचे

डोंगरमाथ्यावरी पोचलो धरुनी हाती हात
त्या कष्टांचे आज गाऊ या आपण सारे गीत
चकित होऊद्या जगताला, ऐकुन गाणे हे नवलाचे
बीज पेरले प्रथम पिढीने वृक्ष जाहले त्यांचे

विजेपरी लखलखते अमुच्या तेजाने आकाश
गळ्याभोवती सदैव तुमच्या प्रेमाचा मधुपाश
तृणांकुरांना अमुच्या राहो सदैव बळ खड्गाचे
बीज पेरले प्रथम पिढीने वृक्ष जाहले त्यांचे

**Dilip V. Chitre,**
**309 Caloosa Palms Court,**
**Sun City Center,**
**Florida 33573 , USA***

**Dilip_chitre@hotmail.com ***
**813-633-1236**